पायाभूत आराखडा -२ योजनेस
मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०१७/प्र.क्र.२३२/ऊर्जा-५

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक : ०५ जानेवारी, २०१८.

वाचा : (१) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. इन्फ्रा-२/२०१२/प्र.क्र.८७२/ऊर्जा-५, दिनांक ०२ मार्च, २०१३.

(२) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, क्र. संकिर्ण २०१३/प्र.क्र.२०८/ऊर्जा-५, दिनांक १९ डिसेंबर, २०१३.

प्रस्तावना:-

महावितरण कंपनी महाराष्ट्र राज्यात (मुंबई व काही उपनगरे वगळून) वीज वितरण करण्याचे काम करीत आहे. दिनांक ६ जून २००५ ला महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे चार कंपन्यात रुपांतर झाले - (१) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधारी कंपनी (MSEBHCL) (२) महानिर्मिती (MSPGCL) (३) महापारेषण (MSETCL) (४) महावितरण (MSEDCL). विभाजनावेळी महावितरण कंपनीची वीज वितरण प्रणाली अत्यंत जीर्ण, ओव्हर लोड अशी होती. ही विद्युत प्रणाली झपाटयाने वाढणाऱ्या वीजेच्या मागणीसाठी सक्षम नव्हती. सदर विद्युत प्रणालीचे आधुनिकीकरण व सक्षमीकरण करणे अत्यंत गरजेचे होते तसेच स्वयंप्रेरित वितरण नेटवर्क नियोजन अत्यावश्यक झाले होते.विद्युत प्रणाली अधिक सक्षम, बळकट करण्याकरिता तसेच कार्यक्षमता वाढविण्यासाठी व त्याचा विस्तार करण्यासाठी महावितरण कंपनीने पायाभूत आराखडा प्रकल्प-१ (इन्फ्रा-१) हा प्रकल्प सन २००८-०९ मध्ये ५ वर्षांच्या कालावधीकरिता तयार केला होता.

२. पायाभूत आराखडा-१ यशस्वीरित्या राबविल्यानंतर,भविष्यातील वीजेच्या मागणीनुसार वीजेची उपलब्धता करण्याकरिता, पायाभूत आराखडा प्रकल्प-२ (इन्फ्रा-२)ही योजना महावितरण कंपनीतर्फे राबविण्यात येत आहे. सन २०१३-१४ ते २०१६-१७ या कालावधीत येणाऱ्या सर्व वर्गवारीतील नवीन विद्युत जोडण्या मागणीनुसार देण्याकरिता सदर प्रकल्प राबविण्यात येत आहे.

३. दि.१६ जानेवारी, २०१३ रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीतील निर्णयानुसार, सन २०१३-१४ ते २०१६-१७ या कालावधीत पायाभूत आराखडा प्रकल्प-२ (इन्फ्रा-२) ही योजना राबविण्यास व त्याकरिता वर्षनिहाय नियतव्यय व अर्थसंकल्पिय तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली होती. सदर प्रकल्पाची निविदा प्रक्रिया सन २०१३ मध्ये सुरु झाली ती विविध कारणांमुळे ऑक्टोबर, २०१५ पर्यंत पूर्ण करण्यात आली. काही ठिकाणी RoW तसेच वीज उपकेंद्रासाठी जागा वेळेत न मिळाल्यामुळे योजना विहित कालावधीत पूर्ण होऊ शकली नाही. सद्यस्थितीत ८७ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित कामे पूर्ण करण्यास सदर योजनेस मार्च, २०१९ पर्यंत मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याकरिता दिनांक २१ नोव्हेंबर, २०१७ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत पायाभूत आराखडा-२ योजनेच्या कालावधीस मार्च, २०१९ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने पुढील निर्णय घेतले आहेत:-

शासन निर्णय :-

१. महावितरण कंपनीच्या पायाभूत आराखडा-२ योजनेस मार्च, २०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरयोजनेतंर्गत शासनाकडून महावितरण कंपनीस उर्वरित समभागाच्या रक्कमेसाठी सन २०१७-१८ करिता रुपये ५६०.८० कोटी एवढी अर्थसंकल्पित तरतूदवितरित करण्यास व उर्वरित समभागाच्या रक्कमेसाठी होणारा खर्चसन २०१८-१९ यावर्षी विभागास उपलब्ध होणाऱ्या एकूण मंजूर नियतव्ययातून भागविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर योजनेची अंमलबजावणी काटेकोरपणे करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करावा.

४. हा शासन निर्णय, नियोजन विभागाच्या सहमतीने व त्यांचा अनौ.संदर्भ क्र.१३०/१४६१दिनांक २०.१२.२०१७ तसेच वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांचा अनौ.संदर्भ क्र.२६३/१७/व्यय-१६ दिनांक ३०.१२.२०१७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. हा शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०१०६१२४१०५१७१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Bhimashankar Yallappa Manta

Digitally signed by Bhimashankar Yallappa Manta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries,Energy And Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=873ce9a279d9561ff0cbf658e05b823c67c79dcac309fc4ebdac035d6aeec2a0, cn=Bhimashankar Yallappa Manta
Date: 2018.01.06 12:44:58 +05'30'

(भि. य.मंता)
शासनाचे उपसचिव

प्रत:

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा. मंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, विधानभवन, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव
६. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
८. सर्व मंत्रालयीन विभाग
९. सचिव,महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर नं. १,१३वा मजला,कफ परेड, मुंबई ०५.
१०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर
१२. महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१४. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
१५. अवर सचिव, नियोजन विभाग (कक्ष-१४६१), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. अवर सचिव (ऊर्जा-३), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. कक्ष अधिकारी, (अर्थसंकल्प/व्यय-१६), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. निवड नस्ती (ऊर्जा-५), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९. ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने.